

**भारतात अक्षय - नूतनीकरणक्षम ऊर्जेबद्दल (रिन्युएबल एनर्जी ) जागरूकता निर्माण करण्यासाठी माहितीची निर्मिती व प्रसार वितरण करण्यासाठी प्रस्ताव मागवण्यात येत आहेत.**

कृपया खालील पात्रता आणि अर्ज प्रक्रियेबद्दल महत्त्वाची माहिती काळजीपूर्वक वाचावी.

**अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत: १५ मे २०२३, रात्री ११.५९ (भारतीय वेळ)**

'इंटरन्यूज अर्थ जर्नेलिझम नेटवर्क-**'इजेएन'** (Internews' Earth Journalism Network - EJN) भारतात अक्षय वा नूतनीकरणक्षम (रिन्युएबल) ऊर्जेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी माहितीची निर्मिती व प्रसार वितरणाला चालना देण्याचा प्रयत्न करत आहे. ह्या टप्प्यात बिहार, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश या राज्यांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

नूतनीकरणक्षम ऊर्जेबाबत सखोल, विस्तृत व दर्जेदार माहितीची निर्मिती करून धोरणकर्ते, प्रकल्प विकासक, गुंतवणूकदार आणि निरीक्षकांमध्ये जागरूकता वाढवणे असा 'इजेएन' चा उद्देश आहे.

**आढावा**

कोविड-१९ ची महासाथ आणि त्यानंतरच्या जागतिक आर्थिक मंदीचा नूतनीकरणक्षम उर्जा (रिन्युएबल एनर्जी ) प्रकल्पांवर परिणाम झाला आहे . शिवाय नूतनीकरणक्षम ऊर्जेबाबत योग्य धोरण, त्यासाठी वित्तपुरवठा, योग्य कालावधीत पेमेंट, आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता अशा अनेक आव्हानांचे अडसर येत असल्यामुळे उर्जा उत्पादक व विकासक चिंतेत आहेत. भारताचे २०३० पर्यंत ५०० गिगा वॅट (GW) क्षमतेची नूतनीकरणक्षम ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट असल्यामुळे नूतनीकरणक्षम उर्जेचे उत्पादन

वाढत जाणार आहे. त्यामुळे नूतनीकरणक्षम ऊर्जा निर्मिती व वितरण याबाबत सार्वजनिक जागरूकता वाढवणे गरजेचे आहे. नूतनीकरणक्षम ऊर्जाविषयीचे प्रभावी धोरण, त्यासाठी लागणारा वित्तपुरवठा आणि पायाभूत सुविधांमधील अडथळे आणि त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना याविषयी सखोल लेख, वृत्तांकन व दृकश्राव्य माहिती तयार करण्यासाठी पाठ्यवृत्ती फेलोशिप प्रदान करण्यात येणार आहे.

**आशय**

धोरण, वित्तपुरवठा, पेमेंट आणि पायाभूत सुविधांच्या अडथळ्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या आणि त्यावर मात करण्यासाठी प्रभावी धोरणे आणि उपाय अशी समग्र दृष्टी असणाऱ्या प्रस्तावांचे 'इंटरन्यूज अर्थ जर्नेलिझम नेटवर्क-'**इजेएन**' स्वागत करत आहे.

भारतात, विशेषत : बिहार, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमध्ये अक्षय ऊर्जा क्षेत्राची स्थिती आणि धोरणांबद्दल जागरूकता वाढवणाऱ्या अहवालांच्या विकास, उत्पादन आणि प्रकाशनाला समर्थन देण्याचे आमचे ध्येय आहे.

व्यापकपणे हाताळल्या न गेलेल्या विषयांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या प्रस्तावांना प्राधान्य दिले जाईल .

वारंवार प्रसिद्धीस आलेल्या समस्या व प्रकिया यांना अत्यल्प प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. नवीन पैलू नजरेस यावेत हा ह्या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

**पात्रता**

भारतातील सर्व राज्यांमधील रहिवाशी प्रस्तावास पात्र आहेत, परंतु बिहार, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमधील नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या प्रस्तावांना प्राधान्य दिले जाईल.

माहिती निर्माण करणाऱ्या व्यक्ती वा त्यांचा गट व चमू देखील प्रस्तावास पात्र ठरू शकतो. तथापि, एका प्रमुख अर्जदाराच्या नावाने करणे आवश्यक आहे. अग्रगण्य अर्जदार -'**इजेएन**'शी संवाद साधण्यासाठी आणि पुरस्कार मिळाल्यास गटाच्या वतीने मोबदला म्हणून निधी प्राप्त करण्यासाठी जबाबदार असतील.

यासाठी आम्ही इंग्रजी, हिंदी, मराठी आणि तमिळ ह्या भाषांमधील अर्ज स्वीकारणार आहोत.

भारतात ऑनलाइन, प्रिंट, टेलिव्हिजन व रेडिओ अशा विविध प्रकारच्या माध्यमातील माहिती निर्माण करणाऱ्या व्यक्ती वा व्यक्तींचा गट व समूह तसेच नूतनीकरणक्षम ऊर्जेच्या क्षेत्रात स्वारस्य असणारे तज्ज्ञ हे प्रस्तावासाठी अर्ज करू शकतात. नियमितपणे अर्थव्यवस्था, व्यवसाय आणि उर्जा ह्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल समान संधी सुनिश्चित करण्यासाठी, महिला, तरुण आणि स्थानिक समुदायातील सदस्यांकडून अर्जांना प्रोत्साहन दिले जाईल

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्थानिक कर्मचारी ,तसेच स्वतंत्र व्यक्ती वा समूह अर्ज करू शकतात.

अर्जदार हे बेकायदेशीर, अनैतिक किंवा अयोग्य व्यावसायिक वर्तनात गुंतलेले आढळल्यास त्यांना अपात्र ठरवण्याचा, अधिकार '**इजेएन**' राखून ठेवते.

**स्वरूप**

निवड झालेल्या प्रत्येक अर्जदाराला अंदाजे रु. ९०,०००/- मानधन दिले जाईल. नाविन्यपूर्ण व संशोधनात्मक प्रस्तावास आवश्यक प्रवास व अनुषंगिक कार्यासाठी मानधन देण्यासाठी '**इजेएन' चे** धोरण लवचिक असेल.

निवड झालेल्या अर्जदाराने प्रस्तावानुसार माहितीची निर्मिती व प्रसिद्धी निर्धारित वेळेत करून पाठ्यवृत्ती कराराचे पालन करणे अनिवार्य असेल.

सर्व माहिती १५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत प्रकाशित व्हावी याद्दष्टीने अपेक्षेने मे महिन्यात अर्जदारांची निवड करून त्यांच्यासोबत सहमती करार करण्याचे नियोजन आहे. या वेळापत्रकाचा अर्जदारांनी विचार करावा.

**सुरक्षितता :**

अर्जदारांनी प्रवासात तसेच माहिती गोळा करताना कोविड-१९ च्या सार्वजनिक नियमांचे पालन करण्यास आम्ही प्रोत्साहितकरतो. कोविड१९ संबंधित चाचण्या किंवा वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरण यांवरील खर्चास स्वतंत्र तरतूद म्हणून आवश्यक असलेला निधी दिला जाईल.

**भाषा :**

निर्माण केलेली माहिती ही इंग्रजी वा स्थानिक भाषेमध्ये किंवा दोन्हीमध्ये तयार केली जाऊ शकते.

आम्ही स्थानिक भाषांमधील अभिव्यक्ती व निर्मिती तसेच स्थानिक प्रसार माध्यमांसाठी माहिती व वृतांकन यांना प्रोत्साहन देत असतो. तथापि, व्यापक प्रसारासाठी, इंग्रजीतून भाषांतर गरजेचे असू शकते तशी आवश्यक असल्यास, अंदाजपत्रकात भाषांतराचा खर्च समाविष्ट करावा.

**निधीचे अंदाजपत्रक :**

सर्व अर्जदारांनी कृती कशी करावी यासाठी वापरलेला नमुना (टेम्पलेट)चा वापर करून योग्य त्या खर्चासाठी तपशीलवार निधीचे अंदाजपत्रक (बजेट) सादर करणे आवश्यक आहे. हे निधी अंदाजपत्रक वाजवी असावे, त्यात प्रवास आणि निवास व इतर अनुषंगिक खर्चाचा स्वतंत्रपणे उल्लेख करावा. प्रस्तावित माहितीसाठी तुम्हाला इतर कोणत्याही स्त्रोतांकडून निधी मिळत असल्यास त्याचा तसा उल्लेख केला जावा.

वाजवी व अल्प निधीच्या अंदाजपत्रकांना अधिक स्पर्धात्मकता लाभत असते. परंतु नाविन्यपूर्ण, संशोधनात्मक व मोलाची भर घालण्याची क्षमता असणाऱ्या प्रस्तावांकरिता अधिक निधीच्या अंदाजपत्रकांचा विचार केला जाईल. आम्ही मल्टीमीडिया वापरण्यास प्रोत्साहन देतो. मल्टीमीडिया

कथनांसाठी अर्जदारांनी व्हिडिओ क्लिप आणि फोटोंसारख्या मल्टीमीडिया घटकांसाठी निधीचा अंदाजपत्रकात उल्लेख करावा.

अर्जदाराकडे व प्रस्तावासाठी आवश्यकता असलेली उपकरणे वा सामग्री (कॅमेरा, ड्रोन, लाइटिंग, ट्रायपॉड इ.)उपलब्ध असतील, असे गृहित धरले आहे. उपकरणे वा सामग्री यासाठी नव्याने मोठी खरेदी करावी लागणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

अर्जदार स्वतंत्र(फ्री लान्सर) असल्यास त्यांना छात्रवृत्ती देण्याचा विचार केला जाईल. सामग्री तयार करण्यासाठी लागणारा कालावधी व त्यासाठी प्रचलित असणारा दर यांनुसार तुम्हाला अपेक्षित रकमेचा अंदाजपत्रकात उल्लेख करावा. तथापि छात्रवृत्तीसाठीची तरतूद ही एकंदरीत अंदाजपत्रकाच्या ३०% पेखा अधिक असू नये, याची दाखल घ्यावी.

**प्रसिद्धीचे अधिकार :**

पाठ्यवृत्तीप्राप्त व करारबद्ध अर्जदार, 'इंटरन्यूज अर्थ जर्नेलिझम नेटवर्क-'इजेएन' शी असलेल्या कराराच्या कालावधीत ते संलग्न असलेल्या माध्यम संस्थेतून त्यांची माहिती प्रसिद्ध व वितरीत करू शकतात आणि ह्या कालावधीत'इंटरन्यूज अर्थ जर्नेलिझम नेटवर्क-'इजेएन'ला देखील ही माहिती प्रसिद्ध व वितरीत करण्याचे अधिकार आहेत.

**निवडीचे निकष**

प्रस्ताव तयार करताना प्रसिद्ध व वितरीत खालील मुद्द्यांचा विचार करावा.

- प्रासंगिकता (रिलेव्हन्स ):- हा प्रस्ताव मागवण्यामागील ध्येय व उद्दिष्टांची पूर्तता करतो का?

ही माहिती वा अहवाल कोणासाठी व का महत्त्वाचा आहे? प्रस्तावाची मुख्य कल्पना व त्याचा प्रभाव याची स्पष्टता आहे काय

- दृष्टी (ॲंगल):- प्रस्तावातील मांडणी ही ह्या आधीही झाली असल्यास तुमच्या प्रस्तावात काही नवी दृष्टी वा नवा पैलू आहे काय?
- प्रभाव:- वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांचे तत्काळ लक्ष वेधणारी, नव्या वादसंवादाला चालना देणारी वा कृती करण्यास उद्युक्त करेल अशी मांडणी प्रस्तावात आहे काय?
- नाविन्यपूर्ण कथन :- कथन करताना सर्जनशीता, नाविन्यपूर्णता आणताना मल्टीमीडिया आणि डेटा व्हिज्युअलायझेशनचा कल्पक वापर असल्यास प्राधान्य दिले जाईल.

माहिती प्रसिद्धीचे नियोजन व सुयोग्य वेळापत्रक : अर्जदारांनी १५ ऑक्टोबर २०२३ ह्या कालमर्यादेच्या आत सर्व माहिती संबंधित मीडिया आउटलेटमधून प्रसिद्ध व प्रसारित करण्याचे समर्थन पत्र समाविष्ट करणे आवश्यक आहे.

**अर्ज प्रक्रिया**

•पृष्ठाच्या शीर्षस्थानी 'नाऊ अप्लाय' ( आता अर्ज करा) बटणावर क्लिक करा.

•तुमच्याकडे विद्यमान खाते असल्यास, तुम्हाला लॉग इन करणे आवश्यक आहे .आम्ही अलीकडेच आमची वेबसाइट अपडेट केल्यामुळे, तुम्हाला कदाचित " पासवर्ड विसरलात?" वर क्लिक करून तुमचा पासवर्ड रीसेट करावा लागेल.

* तुमच्याकडे खाते नसल्यास, तुम्ही पृष्ठाच्या वरच्या उजव्या बाजूला" लॉग इन "वर क्लिक करून नोंदणी करणे आवश्यक आहे आणि उघडलेल्या पृष्ठाच्या तळाशी असलेल्या" साइन अप "लिंकवर क्लिक करा .खाते कसे तयार करावे यावरील तपशीलवार सूचनांसाठी येथे क्लिक करा आणि तुमचा पासवर्ड कसा रीसेट करायचा यावरील तपशीलवार सूचनांसाठी येथे क्लिक करा.

•तुम्ही अर्ज भरण्याची प्रक्रिया ( ॲप्लिकेशन) सुरू केल्यानंतर काही काळाने परत येऊन ते पूर्ण करू इच्छित असल्यास, तुम्ही 'सेव्ह ड्राफ्ट' वर क्लिक करू शकता. मसुद्यावर परत येण्यासाठी आणि अर्ज अंतिम करण्यासाठी पुन्हा'ह्या 'दुव्यावर' वर क्लिक करावे लागेल.

•अर्जदारांनी विनंती केलेल्या रकमेचे तपशीलवार निधी अंदाजपत्रक सादर केले पाहिजे . या लिंकवर क्लिक करून आता बजेट टेम्पलेट डाउनलोड करा.

•सर्व अर्जदारांशी संबंधित मीडिया आउटलेटकडून सर्व माहिती प्रसिद्ध व प्रसारित करण्याचे समर्थन पत्र दाखल करणे आवश्यक आहे

•अर्जदारांनी त्यांच्याकडून प्रसिद्ध वा प्रकाशित झालेल्या माहिती अहवालांचे दोन नमुने किंवा संबंधित कामाच्या लिंक्स दाखल करणे आवश्यक आहे.

- टीप तुम्ही अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर तुम्हाला :आवश्यक दस्तऐवज अपलोड करण्यास सांगितले जाईल, म्हणून कृपया ते सुलभ ठेवा.
- तुमचा अर्ज दाखल करताना अडचणी येत असल्यास किंवा कोणतेही प्रश्न असल्यास, कृपया info.ejn@internews.org वर ईमेल करा . या प्रस्तावविषयी इतर कोणत्याही इंटरन्यूज ईमेलशी संपर्क साधू नये.
- अंतिम मुदतीनंतर दाखल केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

फलकावरील छायाचित्र : बिहारमधील सौर उर्जेवर चालणारी सिंचन प्रणाली. सौजन्य:- CGIAR साठी आयुष माणिक. *Flickr*.

- 